# फिलाडेल्फियाचा कोकणी बाणा

‘मुलाचा वाढदिवस करायचा पुढच्या महिन्यात आणि हॉलच मिळत नाहीये. तुझ्या माहितीत आहे का कुठला चांगला हॉल? पण आपल्या एरियात हवाय हं!’

‘स्टेशनच्या आसपास कुठलं चांगलं होटेल आहे? फॉरीनचे डेलिगेट्स येणारेत चार दिवसांनी. त्यांच्या राहण्याची व्यवस्था करायची जबाबदारी माझ्यावर आहे. प्लीज, जरा शोधून काढा ना!’ किंवा ‘अमर सिनेमा कसा आहे गं? फॅमिलीबरोबर बघण्यासारखा आहे ना? ‘आमचा फ्लॅट भाड्याने द्यायचाय. कुणी चांगलं गिऱ्हाईक बघ ना!’

हे संवाद आपल्या अगदी परिचयाचे. आजच्या धावपळीच्या जगात आपल्याला घरच्या माणसांसाठीच वेळ मुद्दामहून काढावा लागतो, तर मित्रमंडळी, नातेवाईक यांच्या नेहमीच्या भेटीगाठी ही लांबचीच गोष्ट. एखादा कार्यक्रम करायचा, एखादी नवी वस्तू विकत घ्यायची किंवा कुठे भेट द्यायची असेल, तर त्यासाठी शोधाशोध, माहिती संकलन, पूर्वतयारी, चर्चा, संबंधितांना पडताळून घेणे, या गोष्टींसाठी अनेकदा इच्छा असूनही वेळ देता येत नाही. दिला, तरी इतर सगळं वेळापत्रक कोलमडतं. अशा वेळी आपली जवळची मित्रमंडळीच आपल्या मदतीला धावून येतात. ‘अमक्याकडे तमकं चांगलं मिळतं,’ इथपासून ते ‘आम्ही तमक्या ठिकाणी गेलो होतो. ती जागा छान आणि रिझनेबलही आहे,’ इथपर्यंत सल्ले दिले जातात. आपल्याला ते उपयोगी पडतात. फक्त कधीकधी गरजेच्या वेळी नेमके ते मिळत नाहीत. कुणाला विचारावं, हे कळत नाही.

पण यापुढे अडचण येणार नाही. त्याला कारण आहे, WithinContacts हे भारतात डेव्हलप झालेलं ॲप. आणि ते डेव्हलप करण्याची संकल्पना आहे, कोकणातल्या एका छोट्या गावातून आलेले तरुण उद्योजक मंदार मोरेश्वर जोगळेकर यांची.

Bookganga.com ही ऑनलाईन पुस्तक विक्री करणारी कंपनी आणि epapergallery.com सारखी वृत्तपत्रांच्या ई-आवृत्या ऑनलाईन उपलब्ध करून देणारी वेबसाईट, यांची यशस्वी निर्मिती करून स्वत:ला सिद्ध केल्यानंतर मंदार जोगळेकर आता WithinContacts हे नवीन ॲप सादर करून यशाची नवी शिखरं काबीज करण्यासाठी सज्ज झाले आहेत.

कोकणातल्या रत्नागिरी जिल्ह्यात डोंगराच्या कुशीत लपलेल्या साखरपा या छोट्याशा गावात मंदार यांचा जन्म आणि प्राथमिक शिक्षण झाले. कोकणातलं भाताचं पीक जसं रुजल्यानंतर काढून दुसरीकडे केलेल्या ‘लावणी’नंतर चांगलं फुलतं, तसंच मंदार यांच्या बाबतीत झालं. साखरप्यात दहावीपर्यंतचं शिक्षण पूर्ण केल्यानंतर ते उच्च शिक्षणासाठी पुण्यात आले. विद्यार्थी सहायक समितीच्या ‘कमवा आणि शिका’ या योजनेअंतर्गत त्यांचे शिक्षण पूर्ण झाले. लहापणापासूनच वडिलांबरोबर काम करताना त्यांच्या अंगात व्यावसायिक वृत्ती रुजू लागली होती. व्यवसाय करताना फायद्याबरोबरच, आपण जी सेवा देतो आहे ती उत्तम दर्जाची हवी, लोकांना समाधान मिळालं पाहिजे आणि व्यवहारात पारदर्शकता हवी, हे मूलभूत तत्त्वे मनात पक्की झाली.



**यावर्षीपासून इंदुमती-वसंत करिअर भूषण पुरस्कार प्रदान केला जाणार असून बुकगंगाचे, मुख्य कार्यकारी अधिकारी श्री. मंदार जोगळेकर यांना जाहीर झाला आहे. त्यानिमित्ताने विशेष लेख...**

ज्या वेळेस भारतात नुकतेच आय पॅड यायला सुरुवात झाली होती त्या दरम्यान जोगळेकरांनी माय विश्व टेक्नॉलॉजीज प्रा. लि. या कंपनीची सुरुवात केली आणि साहित्याचा प्रचार आणि प्रसार करण्यासाठी bookganga.com ची स्थापना केली. भारतीय भाषांतील सर्व लेखक आणि प्रकाशकांची पुस्तके जगभरातील चोखंदळ वाचकांपर्यंत घरपोच पोहोचवण्यासाठी आणि साहित्याचे ई-बुक स्वरूपात जतन करण्याच्या त्यांच्या ध्येयाला उत्तम प्रतिसाद मिळाला. याच बरोबर epapergallery.com द्वारे त्यांनी जगभरातील वृत्तपत्रांना टेक्नोलॉजी देण्यास सुरुवात केली.

कोकणचा कॅलिफोर्निया होईल तेव्हा होईल, पण कोकणातला एक माणूस स्वकर्तृत्वाने फिलाडेल्फियाला जाऊन पोहोचला. आपल्या मायभूमीला न विसरता, आपल्या व्यवसायाचा लाभ आपल्या भागापर्यंत पोहोचविण्यासाठी त्यांनी आवर्जून प्रयत्न केले. कोकणातल्या तरुण मुला-मुलींना या कंपन्यांच्या माध्यमातून रोजगार मिळाला आणि त्यांचं काम आणि त्यांचा आवाज कॅलिफोर्नियासह जगभरात पोहोचला.

‘बुकगंगा’चे काम वाढवताना असे लक्षात आले की मुलाखतीच्या वेळी दिलेली माहिती खरी आणि बरोबर असते असं नाही. कोणत्याही नवीन माणसाला कामला घ्यायचे तर त्याचं बॅकग्राऊंड व्हेरिफिकेशन होणे गरजेचे वाटायला लागले. याच संकल्पनेतून verification.com ची स्थापना झाली. कंपनीमध्ये किंवा ऑफिसमध्ये काम करणाऱ्या प्रत्येक माणसाचं रेसिडेन्शियल, ॲकॅडेमिक, क्रिमिनल रेकॉर्ड व्हेरिफिकेशन केले जाते. व्हेरिफिकेशन केल्याने कामाच्या ठिकाणी रिस्क राहत नाही आणि योग्य तीच माणसे विविध जबाबदाऱ्या सांभाळण्यासाठी निवडली जाऊ शकतात.

काम करताना हेही जाणवत गेले, की आपल्याला एखादी सर्व्हिस हवी असेल उदा. - प्लम्बर, डॉक्टर, लॉयर; एखाद्या पुस्तकाचा, सिनेमाचा, जागेचा रिव्ह्यू हवा असेल किंवा आपल्याला कुठल्याही प्रश्न पडत असेल तर आपण सर्वांत आधी आपल्या माहितीतल्या लोकांकडे चौकशी करतो. योग्य ती माहिती नाही मिळाली तर आपण इंटरनेटवर माहिती शोधतो.

आपली एखादी वस्तू विकण्यासाठी किंवा विकत घेण्यासाठी, एखाद्या कार्यक्रमाला जाण्यासाठी, एखाद्या ठिकाणी फिरायला जाण्यासाठी आपण मित्रमंडळींचा सल्ला घेत असतो. कधी कधी धावपळीमध्ये धावपळीमध्ये काही चांगले कार्यक्रम मिस होतात किंवा माहिती आपल्यापर्यंत पोहोचत नाही. समन्वयाअभावी होणाऱ्या अशा चुका टाळण्यासाठी आणि माहिती शेअर होण्यासाठी एक कॉमन प्लॅटफॉर्म निर्माण केला पाहिजे, असे जोगळेकर यांना वाटायला लागले. आपल्या मोबाईलच्या कॉन्टॅक्ट लिस्टमधूनच असं

▶ ▶ पान क्र. २८ वर

www.bookganga.com
BookGanga
Creation | Publication | Distribution
Thousands of Books, eBooks & eMagazines available
10% OFF
Free Shipping
24x7 Customer Care
सर्व प्रकाशकांची,
सर्व पुस्तके १०% सवलतीत,
भारतात मोफत घरपोच उपलब्ध
फोन ऑर्डरसाठी संपर्क
8600741110
8600751110
8600761110

# फिलाडेल्फियाचा कोकणी बाणा

▶ ▶ पान क्र. २३ वरून

नेटवर्क तयार झालं तर सोन्याहून पिवळं, असा विचार त्यांनी केला.

याच संकल्पनेवर पेटन्टेड इनोव्हेटिव्ह टेक्नॉलॉजी वापरून WithinContacts हे युटिलिटी ॲप डेव्हलप करण्यात आलं. हे ॲप आपल्या फोन कॉन्टॅक्ट लिस्टची खरी ताकद एक्स्प्लोअर करते. या ॲपमध्ये सर्विसेस, जॉब्स, रिव्ह्यूज, इव्हेंट्स बाय/सेल, क्वेशन्स आणि ग्रुप्स ही फीचर्स आहेत. हे सर्व आपल्या खात्रीशीर कॉन्टॅक्ट नेटवर्कमध्ये मिळते.

सर्वांत महत्त्वाचे म्हणजे, या ॲपमुळे आपला वेळ वाचणार आहे आणि आपल्याच ओळखीच्या नेटवर्कमधूनच आपल्याला कोणतेही सोल्युशन पटकन मिळणार आहे.

या ॲपमध्ये वेगवेगळे रेसिडेन्शिअल, प्रोफेशनल, कॉलेज, शाळा, विविध संस्था यांचे ग्रुप्स तयार करता येतात आणि त्यामध्ये मेसेजेस पाठवणे, इव्हेन्ट्स आयोजित करणे, बाय/सेल, क्वेशन्स हे सर्व पोस्ट करता येते.

थोडक्यात WithinContacts हे नुसतेच चॅट, फोटो शेअरिंग एवढ्यावर मर्यादित न राहता एक पाऊल पुढे जाऊन युटिलिटी ॲप म्हणून वापरता येणार आहे. कोणत्याही छोट्या मोठ्या व्यावसायिकाला आपले काम एकाच वेळेस अनेक पोटेन्शियल कस्टमर्सपर्यंत पोहोचवता येणार आहे. इतकेच नाही तर आपल्याला नुसती माणसं चेहऱ्याने माहिती नसतील तर ते नक्की काय करतात, त्यांच्या कुठल्या स्किल्स आहेत हे देखील लगेच समजणार आहे आणि आपल्या सर्व्हिसेसही लिस्ट करता येणार आहे. फिलाडेल्फियास्थित जोगळेकरांनी भारतात विकसित केलेले "Make in India' हे पहिले ॲप आहे जे आता ग्लोबली वापरलं जाणार आहे.

E-mail : info@myvishwa.com, bookganga@myvishwa.com, Web. www.bookganga.com, www.withincontacts.com, www.verification.com